ADFACTORS PR
Knowledge-driven communications

| Published Date: | 5 Sep 2018 | Publication: | Deshonnati (Marathi) |
|---|---|---|---|
| Edition: | Nagpur | Page No: | 2 |
| MAV/CCM: | 17204/18.7 | Circulation: | 40000 |


# टीसीएस आयटी विझ २०१८ च्या नागपूर आवृत्तीत सेंटर पॉइंट स्कूलने मिळविले यश

*प्रतिनिधी / ४ सप्टेंबर*

**नागपूर :** टीसीएस आयटी विझ २०१८ च्या नागपूर आवृत्तीत वर्धमान नगर येथील सेंटर पॉइंट स्कूलचे संचित खेडकर आणि अर्चित वेणुगोपालन विद्यार्थ्यांनी यश पटकाविले.

टीसीएस कंपनीतर्फे दि. ४ सप्टेंबर, मंगळवारी, सिव्हिल लाईन येथील डॉ. वसंतराव देशपांडे सभागृहात आयोजित करण्यात आलेल्या स्पर्धेत तब्बल ८५० पेक्षा जास्त शालेय विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदविला होता. यावेळी ॲनिमेटेड सॉफ्टवेअर वापरून मास पर्सनलायझेशन, लिव्हर्जी इकोसिस्टम, क्रिएटिंग एक्सपोनेन्शल व्हॅल्यू आणि एम्ब्रेसिंग रिस्क अशा पाच फेऱ्या घेण्यात आल्या. त्याचबरोबर टीसीएस ५० ही विशेष फेरीही घेण्यात आली. स्पर्धेतील सर्वोत्तम सहा टीम प्रादेशिक अंतिम फेऱ्यांमधील लिखित प्राथमिक फेरीसाठी पात्र ठरल्या होत्या.

प्रादेशिक अंतिम फेरीमध्ये पाच



विजयी चमूसह उपस्थित प्रमुख अतिथी

फेऱ्या झाल्यावर वर्धमान नगर येथील सेंटर पॉइंट स्कूलचे संचित खेडकर आणि अर्चित वेणुगोपालनच्या विद्यार्थ्यांनी यश पटकाविले. तर उपविजेते जीएच रायसोनी नागपूरचे देव अशर आणि गौरव सिंग ठरले.

या वर्षीच्या प्रादेशिक चॅम्पिअन्सनी तब्बल ६० हजार रुपयांचे गिफ्ट व्हाउचर्स मिळवले. तर उपविजेत्यांना ४० हजार रुपये मूल्यांची गिफ्ट व्हाउचर्स पटकावली. नागपूरमधील विजेते राष्ट्रीय स्तरावरील अंतिम फेरीसाठी प्रतिनिधित्व करतील. यावेळी भारतभरातून ११ प्रादेशिक चॅम्पिअन्स सहभागी असणार आहेत. टीसीएस नागपूरचे केंद्र प्रमुख अरविंद कुमार यांनी बक्षिसांचे वितरण केले. टीसीएस आयटी विझ २०१८ भारतातील अहमदाबाद, बंगळुरू, चेन्नई, हैदराबाद, कोलकाता, इंदौर, नागपूर, भुवनेश्वर, कोची, दिल्ली, मुंबई आणि पुणे अशा १२ शहरांमध्ये आयोजित केल्या जातील.